FICCI

ADITYA BIRLA GROUP

FICCI – ADITYA BIRLA
CSR Centre For Excellence

अफार्म, पुणे

## कार्यक्रम पत्रिका

हवामानानुकूल - अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रोत्साहन अभियान

अंतर्गत

# शेतकरी मेळावा

धोतर्डी येथील सर्व शेतकरी बांधवांना कळविण्यात येते की, अफार्म संस्था, पुणे व फिक्की यांच्या सहकार्याने मंगळवार दि. 17 जानेवारी 2023 रोजी सकाळी 11.00 वाजता धोतर्डी येथे महंत महाराज आश्रमात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्याला शेती तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी आपली उपस्थिती प्राथनीय आहे.

**प्रमुख मार्गदर्शक :**

मा. श्री शशिकिरण रा. जांभरूणकर, तालुका कृषि अधिकारी, अकोला,

श्री चारुदत्त ठिपसे, शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, सिसा ( उदेगाव ),अकोला,

मा. श्री सागर डोंगरे, प्रकल्प विशेषज्ञ कृषि,

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प ( पोखरा ) , अकोला

**प्रमुख अतिथी :**

मा. श्री प्रदीप राऊत, मंडळ कृषि अधिकारी, अकोला 1 ,

मा. श्री. एस.पी. संके, मंडळ कृषि अधिकारी, अकोला 2

मा. श्री. सुशिल कोकाटे, कृषि पर्यवेक्षक

मा . श्री. अजितराव किसनराव जायले, प्रगतीशिल शेतकरी, धोतर्डी

**कार्यक्रमाचे अध्यक्ष :**

मा. श्री. रामेश्वरराव लक्ष्मणराव गोहाडे, मा. सरपंच, ग्राम पंचायत, धोतर्डी, ता.जि.अकोला

**आयोजक :**

सेवाधर्म शिक्षण व बहुउयुद्धेशिय संस्था, अकोला

मातृभूमि
# अकोला सिटी
अकोला । शनिवार २१.०१.२०२३ epaper- www.ematrubhumi.com/ eportal -www.ematrubhumis.in

# जिवाणू खताचा वापर वाढवावा : ठिपसे

मातृभूमि वृत्तसेवा
। अकोला, दि. २० ।

जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जीवाणू खताचा वापर करावा असे आवाहन शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांनी केले आहे.

अकोला तालुक्यातील घोतर्डी येथे अफार्म पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहुउयुद्धेशिय संस्था, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्पाचे अंतर्गत हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसिद्धी अभियान, शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ठिपसे मार्गदर्शन करीत होते. या वेळी सरपंच रामेश्वर राव गोहाडे, प्रयोगशिल जेष्ठ शेतकरी अजितराव जायले, जगन्नाथ वरघट, कृषी सहायक कु. एन. व्ही.. गावंडे, गोपाल साहेबराव दाळू, सेवाधर्म संस्थेचे सचिव तुषार हांडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. डॉ. ठिपसे मार्गदर्शन करताना म्हणाले की, अधिक उत्पादन मिळावे म्हणून आज शेतकरी आवश्यक नसतांना




खूप मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर, गरजेचे नसतांना रासायनिक औषधांची फवारणी केली जाते, त्यामुळे उत्पादन खर्च भरमसाठ वाढतो. हवे मध्ये नत्र असतांना युरिया चा वापर होत आहे. अजितराव जायले यांनी मेळाव्यात संबोधित करताना सांगितले की, जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आपल्या शेतातील पिकाचा हंगाम संपल्यावर जे काही पिकाचे अवशेष, गवत, पाला पाचोळा जाळून न टाकता त्याला शेतातच कुजवून सेंद्रिय खतांची निर्मिती करण्यात येऊन त्याचाच उपयोग आपल्या शेतात करावा जेणेकरून जमिनीचा पोत सुधारणा होऊन उत्पादन वाढेल.

प्रस्ताविक व मार्गदर्शन जगन्नाथ वरघट यांनी केले. यावेळी आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव तुषार हांडे यांनी मानले. यावेळी हरिदास भानुदास वानखडे, गजानन रामचंद्र सोरातकार, ओम महल्ले, सुधीर गवळी प्रभाकर गावंडे, गौतम वानखडे, सौ उर्मिला विठ्ठल सरकटे, सौ पद्मा शिवाजी कड यांच्या स ह शेतकऱ्याची उपस्थिती होती.

www.epunyanagari.com Toll Free ✆ 18002081019

पुण्य नगरी

नागपूर-अकोला । रविवार, २२ जानेवारी २०२३ वर्ष : १६ । अंक : ३०४ । पाने : १०+४=१४ । किंमत : ५.००

# सांगळूद येथे हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतकरी मेळावा



अकोला, दि. २१ (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून शाश्वत उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्था, अकोला या सेवाभावी संस्थेने सांगळूद येथे १९ जानेवारीला हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतकरी मेळावा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

मेळाव्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठचे कृषी मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख अधिकारी तथा कृषी विद्यावेत्ता डॉ. प्रकाश घाटोळ यांनी हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाची विस्तृतपणे माहिती देऊन शेतीमध्ये फक्त परिपक्व शेणखताचा वापर करावा, अशी सूचना केली. त्यामध्ये रुंद वरंबा सरी तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, एकात्मिक कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धतीचा वापर करणे, शाश्वत शेतीची संकल्पना स्पष्ट करून शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करणे आदींबाबत मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक यू.डी. सुलतान यांनी हवामान बदलाचे शेतीवर होणारे दुष्परिणाम यांची माहिती दिली. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्ताने उपस्थित शेतकऱ्यांना तृणधान्याचे आहारातील महत्त्व आणि पीक फेरपालट करून तृणधान्य लागवड संदर्भात मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव तुषार हांडे यांनी सेंद्रिय शेती उपक्रमाची विस्तृतपणे माहिती देऊन अल्प खर्चिक शाश्वत शेती पद्धती मार्गदर्शन पुस्तिकेचे वितरण केले. यावेळी सरपंच शीतल काळे, रेखा तायडे, रंजित काळे पाटील, उदय देवतळे , रामेश्वर चौरीपगार, ब. रा. लांडे, वसंत पांडे, अनुप काकड, के.के. लांडे, अरुण तायडे, मनोहर राऊत, गणेश देशमुख, सुरेश देवतळे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शेतीशाळा प्रशिक्षक आणि गावातील महिला, युवक, पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित
पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी
नवराष्ट्र
नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र
नागपूर, रविवार, 22 जानेवारी 2023 | www.navarashtra.com | /navarashtra

# हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतकरी मेळावा

## अफार्म, सेवाधर्म बहूद्देशीय संस्थेचा उपक्रम

**अकोला**, ब्युरो. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून शाश्वत उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्था, अकोला या सेवाभावी संस्थातर्फे सांगळुद येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन 19 जानेवारीला करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कृषी मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख अधिकारी डॉ. प्रकाश घाटोळ यांनी हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाची विस्तृतपणे माहिती देऊन शेतीमध्ये फक्त परिपक्व शेणखताचा वापर करावा, अशी सूचना केली. त्यामध्ये रुंद वरंबा सरी



तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, एकात्मिक कीड रोग, अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धतीचा वापर करणे, शाश्वत शेतीची संकल्पना स्पष्ट करून शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करणे आदीबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक यू. डी. सुलताने यांनी हवामान बदलाचे शेतीवर होणारे दुष्परिणाम यांची विस्तृतपणे माहिती देऊन अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये शाश्वत शेती करण्यासाठी शेती शाळेच्या माध्यमातून देण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, शेडनेट पॉलिहाऊस, ठिबक सिंचन, स्प्रिंकलर या संरक्षित शेती घटकांचा लाभ घेऊन शाश्वत शेती करावी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योग, अवजार बँक उभी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष 2023 निमित्ताने उपस्थित शेतकऱ्यांना तृणधान्याचे आहारातील महत्त्व आणि पीक फेरपालट करून तृणधान्य लागवडसंदर्भात मार्गदर्शन केले. सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्थेचे सचिव तुषार हांडे यांनी सेंद्रिय शेती उपक्रमाची विस्तृत माहिती देऊन अल्प खर्चिक शाश्वत शेती पद्धती मार्गदर्शन पुस्तिकेचे वितरण केले. यावेळी सरपंच शीतल रंजित काळे, रेखा तायडे, रंजित काळे, उदय देवतळे, रामेश्वर चौरपगार, ब. रा. लांडे, वसंत पांडे, अनुप काकड, गणेश देशमुखसह ग्रामपंचायत सदस्य, शेतीशाळा प्रशिक्षक, गावातील महिला, पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

MENTARY
R SALE

www.epunyanagari.com Toll Free 18002081019

# पुण्य नगरी

नागपूर-अकोला । गुरुवार, १९ जानेवारी २०२३ वर्ष : १६ । अंक : ३०१ । पाने : १०+४=१४ । किंमत : ५.००

# जीवाणू खतांचा वापर वाढवा : डॉ. चारुदत्त ठिपसे

**अकोला**, दि. १८ (प्रतिनिधी)

जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जीवाणू खताचा वापर करावा, असे आवाहन शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांनी केले आहे.

तालुक्यातील धोतर्डी येथे अफार्म पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्था, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्पाचे अंतर्गत हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसिद्धी अभियान, शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठिपसे मार्गदर्शन करीत होते.



कार्यक्रमाला सरपंच रामेश्वरराव गोहाडे, प्रयोगशील शेतकरी अजितराव जायले, जगन्नाथ वरघट, कृषी सहायक एन.व्ही. गावंडे, गोपाल साहेबराव दाळू, सेवाधर्म संस्थेचे सचिव तुषार हांडे आदींची उपस्थिती होती. डॉ. ठिपसे पुढे म्हणाले, अधिक उत्पादन मिळावे म्हणून आज शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करीत असल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. हवेमध्ये नत्र असताना युरियाचा वापर होत आहे. अजितराव जायले म्हणाले, जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आपल्या शेतातील पिकाचा हंगाम संपल्यावर जे काही पिकाचे अवशेष, गवत, पाला पाचोळा जाळून न टाकता त्याला शेतातच कुजवून सेंद्रिय खतांची निर्मिती करण्यात येऊन त्याचाच उपयोग आपल्या शेतात करावा. जेणेकरून जमिनीचा पोत सुधारून उत्पादन वाढेल. प्रास्ताविक व मार्गदर्शन जगन्नाथ वरघट तर आभार तुषार हांडे यांनी मानले. यावेळी हरिदास वानखडे, गजानन सोरातकार, ओम महल्ले, सुधीर गवळी, प्रभाकर गावंडे, गौतम वानखडे, उर्मिला सरकटे, पद्मा कड यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

नागपूर, गुरुवार, 19 जानेवारी 2023 | www.navarashtra.com | /navarashtra

# जीवाणू खतांचा वापर वाढवा : डॉ. ठिपसे

अकोला, ब्युरो. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जीवाणू खताचा वापर करावा, असे आवाहन शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांनी केले आहे. अकोला तालुक्यातील धोतर्डी येथे अफार्म पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्थेच्यावतीने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसिद्धी अभियान, शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. ठिपसे मार्गदर्शन करीत होते. यावेळी सरपंच रामेश्वर गोहाडे, प्रयोगशिल जेष्ठ शेतकरी अजित जायले, जगन्नाथ वरघट, कृषी सहायक एन. व्ही. गावंडे, गोपाल दाळू, सेवाधर्म संस्थेचे सचिव तुषार हांडे आदींची उपस्थिती होती. डॉ. ठिपसे मार्गदर्शन करताना म्हणाले की, अधिक उत्पादन मिळावे म्हणून आज शेतकरी आवश्यक नसताना खूप मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर, गरजेचे नसताना रासायनिक औषधांची फवारणी करतो आहे. त्यामुळे उत्पादन



खर्च भरमसाठ वाढतो. हवेमध्ये नत्र असतांना युरियाचा वापर होत आहे. अजितराव जायले यांनी मेळाव्यात संबोधित करताना सांगितले की, जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आपल्या शेतातील पिकाचा हंगाम संपल्यावर जे काही पिकाचे अवशेष, गवत, पालापाचोळा जाळून न टाकता त्याला शेतातच कुजवून सेंद्रिय खतांची निर्मिती करण्यात येऊन त्याचाच उपयोग आपल्या शेतात करावा. जेणेकरून जमिनीचा पोत सुधारुन उत्पादन वाढेल. प्रास्ताविक जगन्नाथ वरघट यांनी केले. संस्थेचे सचिव तुषार हांडे यांनी आभार मानले. यावेळी हरिदास वानखडे, गजानन सोरातकार, ओम महल्ले, सुधीर गवळी, प्रभाकर गावंडे, गौतम वानखडे, उर्मिला सरकटे, पद्मा कड यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
▪ नागपूर ▪ वर्धा ▪ भंडारा ▪ गोंदिया ▪ चंद्रपूर ▪ गडचिरोली ▪ अमरावती ▪ यवतमाळ | नांदेड ▪ लातूर ▪ औरंगाबाद-जालना-बीड ▪ हिंगोली-पर

# जीवाणू खताचा वापर वाढवावा

## शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांचे मार्गदर्शन



**अकोला :** जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जीवाणू खताचा वापर करावा, असे आंवाहन शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांनी केले आहे.

अकोला तालुक्यातील धोतर्डी येथे अफार्म पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला यांच्यां संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्पाचे अंतर्गत हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसिद्धी अभियान, शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठिपसे मार्गदर्शन करीत होते. यावेळी सरपंच रामेश्वर राव गोहाडे, प्रयोगशील ज्येष्ठ शेतकरी अजित जायले, जगन्नाथ वरघट, कृषी सहायक एन. व्ही. गावंडे, गोपाल साहेबराव दाळू, सेवाधर्म संस्थेचे सचिव तुषार हांडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. डॉ. ठिपसे मार्गदर्शन करताना म्हणाले की, अधिक उत्पादन मिळावे म्हणून आज शेतकरी आवश्यक नसताना खूप मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर, गरजेचे नसताना रासायनिक औषधांची फवारणी केली जाते, त्यामुळे उत्पादन खर्च भरमसाट वाढतो. हवेमध्ये नत्र असताना युरियाचा वापर होत आहे. अजित जायले यांनी मेळाव्यात संबोधित करताना सांगितले की, जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आपल्या शेतातील पिकांचा हंगाम संपल्यावर जे काही पिकांचे अवशेष, गवत, पाला पाचोळा जाळून न टाकता त्याला शेतातच कुजवून सेंद्रिय खतांची निर्मिती करण्यात येऊन त्याचाच उपयोग आपल्या शेतात करावा जेणेकरून जमिनीचा पोत सुधारणा होऊन उत्पादन वाढेल.

प्रास्ताविक व मार्गदर्शन जगन्नाथ वरघट यांनी केले. यावेळी आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव तुषार हांडे यांनी मानले. यावेळी हरिदास भानुदास वानखडे, गजानन रामचंद्र सोरातकार, ओम महल्ले, सुधीर गवळी, प्रभाकर गावंडे, गौतम वानखडे, उर्मिला विठ्ठल सरकटे, पद्मा शिवाजी कड यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

अकोला, शुक्रवार, २० जानेवारी २०२३

सकाळ ॲग्रोवन

# जिवाणू खतांचा वापर वाढवावा : डॉ. ठिपसे

**अकोला :** "जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जिवाणू खताचा वापर करावा," असे आवाहन शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त ठिपसे यांनी केले.

अकोला तालुक्यातील धोतर्डी येथे अफार्म पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत हवामानानुकूल अल्पखर्चिक शाश्वत शेती तंत्रज्ञान प्रचार प्रसिद्धी अभियान, शेतकरी मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला. सरपंच रामेश्वर गोहाडे, प्रयोगशील शेतकरी अजितराव जायले, जगन्नाथ वरघट, कृषी सहायक कु. एन. व्ही. गावंडे, गोपाल दाळू, तुषार हांडे आदी उपस्थित होते.

डॉ. ठिपसे म्हणाले, "अधिक उत्पादन मिळावे म्हणून शेतकरी आवश्यक नसताना मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करतात. रासायनिक औषधांची फवारणी केली जाते."

जायले म्हणाले, "जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी आपल्या शेतातील पिकाचा हंगाम संपल्यावर जे काही पिकांचे अवशेष, गवत, पालापाचोळा असतो तो जाळून न टाकता त्याला शेतातच कुजवून सेंद्रिय खतांची निर्मिती करता येऊ शकते."